## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :४६६/२०२१/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. राहुल चंद्रकांत भारती,<br>रा. २०, श्रीजी अर्पण,<br>इंदिरा नगर, ता.जि. नाशिक – ०९. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय,<br>धुळवड, ता.सिन्नर, जि.नाशिक. |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**सुनावणी दिनांक २९/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक ११/०८/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २९/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित असून जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ११/०८/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की,आयोगाच्या आदेशानुसार अद्यापही आवश्यक माहिती पुरविली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ३२१२/२०१९/नाशिक वरील निर्णय दिनांक ०५/०२/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धुळवड, श्री. आर.बी. आधाव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २८/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी."

४) जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या अहवालात असे नमूद केले की, आयोगाने द्वितीय अपिल क्र. ३२१२/२०१९/नाशिक संदर्भात दिनांक ०५/०२/२०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थी यांना दि. ०२/०१/२०२० च्या पत्रान्वये माहिती पुरविलेली आहे. याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३/०३/२०२१ अन्वये लेखी खुलासा आयोगाकडे सादर केलेला आहे. त्यामध्ये सदर बाब नमुद केलेली आहे. तसेच आयोगासमोर द्वितीय अपील सुनावणीवेळी कागदपत्रे उपलब्ध नसल्याने सदर बाब आयोगाच्या निदर्शनास आणुन देता आली नाही.

५) उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, तक्रारदार यांना आयोगाच्या आदेशापुर्वीच दि. ०२/०१/२०२० च्या पत्रान्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) प्रस्तुत तक्रार क्रमांक ४६६/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र आ ११२५ 6 MAY 2024

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
खंडपीठ नाशिक